# प्रेसनोट

जा.क्र. पोउआ/वाहतूक/ /२०१९

पुणे शहर, दिनांक १३/०६/२०१९

**विषय :- वाहतुक नियमांचे पालन करणा-या वाहनचालकांसाठी "आभार योजना" चालू केले बाबत.**

---

पुणे शहर पोलीस आयुक्त, डॉ. श्री. के व्यंकटेशम् व पुणे शहर वाहतुक शाखेचे पोलीस उप आयुक्त, श्री. पंकज देशमुख यांचे संकल्पनेतुन, पुणे शहर वाहतुक शाखा तर्फे शहरातील जे वाहनचालक नागरीक दुचाकी व चारचाकी वाहन चालवितात व वाहतुकीचे नियम पाळतात,दुचाकी वाहनचालविताना हेल्मेट परिधान करतात,वाहनचालविण्याचा परवाना जवळ बाळगतात व त्यांचेवर कोणत्याही प्रकारचे वाहतुक नियम मोडल्याचे चलन नाही अशा वाहनचालकांना प्रोत्साहन म्हणून विविध दुकाने, हॉटेल आस्थापना इत्यादी ठिकाणी १० टक्के किंवा त्यांच्या कुवतीनुसार / इच्छेनुसार विविध खरेदीवर सुट देणयाचे कुपन देण्याबाबतची योजना सुरु करण्यात येत असून सदर योजनेस **"आभार"** असे नाव देण्यात आले आहे.

सदर आभार योजनेत जो वाहनचालक वाहतुकीचे नियम पाळतो, त्यांच्या वाहनाचा क्रमांक वाहतुक शाखेकडील अधिकारी यांच्या नाकाबंदी ॲपमध्ये टाकल्यास सदर वाहनावर वाहतुक नियमभंगाचे चलन नसेल अशा वाहन चालकास नमूद वाहतुक शाखेचे अधिकारी एक कुपन एसएमएस च्या स्वरुपात देईल त्यामध्ये नमूद वाहनचालकास पुणे शहरातील विविध हॉटेल्स, दुकाने, आस्थापना या ठिकाणी जावून १० टक्के पर्यंत सुट मिळविता येवू शकते. सदरचे कुपन हे एक महिना मुदतीचे असून त्याचा एकदाच वापर करता येवू शकतो, सदरची योजना ही फक्त पुणे शहरापुरती मर्यादीत आहे.

शहरात जे वाहनचालक वाहतुकीचे नियम १०० टक्के पाळत आहेत त्यांना प्रोत्साहन म्हणून सदरची योजना राबविण्यात येत असून त्यांना प्रोत्साहीत केल्यामुळे इतर वाहनचालकांनाही वाहतुकीचे नियम पाळण्याची इच्छा निर्माण होईल परिणामी शहरातील वाहतुक सुरळीत व सुरक्षित करण्याचे उदिष्ट वाहतुक शाखा पुणे शहर यांनी ठेवले असून वाहनचालकांनी वाहतुकीचे नियमांचे तंतोतंत पालन करुन वाहतुक सुरळीत व सुरक्षीत होण्यास आपले योगदान द्यावे.


पुणे शहर पोलीस आयुक्त
आभार
Aabhaar

